शोध पत्र- समाजशास्त्र

Dec.-09—Jan.-2010

# सावित्रीबाई फुले : स्त्रीमुक्ती

*प्रा. कु.महानंदा राऊतखेडकर

*समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड ( महाराष्ट्र )

सावित्रीबाई फुले यांचा म.ज्योतिराव फुले यांच्यासोबत जेंव्हा विवाह झाला तेव्हा त्यांचे वय अवघे ९ वर्षे होते. आपल्या मानवतावादी, उदारमतवादी, स्त्रीमुक्तीच्या कार्याने व कर्तृत्वाने ही चिमुरडी आज युगस्त्री, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्रीमुक्तीच्या आद्यप्रणेत्या म्हणून ओळखल्या जातात. जन्माला आलेली प्रत्येक व्यक्तीच जीवन जगत असते. अशा सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनाचा, आयुष्याचा जेव्हा आपण मागोवा घेतो तेव्हा त्याला भूतकाळ म्हणावे लागते परंतु असामान्य व्यक्तीच्या जीवनाचा ज्यावेळेस आपण मागोवा घेतो तेव्हा तो डोळे दिपवून टाकणारा, बुद्धीला हेलावणारा, मनाचा थरकाप उठवणारा, आधुनिक युगात रोबोटप्रमाणे वागणाऱ्या मनुष्यात माणुसपण जागा करणारा इतिहास ठरतो. असेच एक असामान्य व्यक्तिमत्त्व आपल्या विचार व आचाराने या भारतभूमित जन्मास आले, उदयास आले आपल्या विचार व आचाराने अजरामर झाले, ते म्हणजे क्रांतीज्योती, युगस्त्री सावित्रीबाई फुले. सावित्रीबाईंनी जे असामान्य, युगप्रवर्तक कार्य केले त्यामुळेच त्या स्त्रीमुक्तीच्या आद्य प्रणेत्या ठरतात. सावित्रीबाईंच्या कार्यामुळेच त्यांचा गौरव भारतातील पहिली 'स्त्री समाज क्रांतीकारक', 'भारतातील पहिली शिक्षिका', 'भारतातील पहिली व्यवस्थापिका', 'भारतातील पहिली समाजसेविका', 'स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या' म्हणून केला जातो.

ज्या काळात समाजात पुरुष सत्ता, धर्मसत्ता यांचा प्रभाव होता आणि या दोन्ही सत्तेमुळे स्त्रिया आपली अस्मिता हरवून बसल्या होत्या, अनेक अमानुष प्रथा, परंपरामुळे त्यांचे कुटूंबात, समाजात सर्वांगीण शोषण होत होते. स्त्रियांकडे केवळ 'एक उपभोग्य वस्तू' म्हणून पाहिले जात होते. तेंव्हा अशा प्रतिकुल परिस्थितीत स्त्री उद्धाराचे, स्त्रीमुक्तीचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. म.फुलेंच्या सामाजिक कार्याचा, विचाराचा प्रभाव सावित्रीबाईवर होताच. पण हा प्रभाव विचारांपुरताच मर्यादित नव्हता तर तो आचाराच्या बाबतीतही होता. म्हणूनच म.फुलेंच्या अर्धांगिणी असलेल्या सावित्रीबाई फुले यांनी एकूणच सामाजिक आणि स्त्री मुक्तीच्या कार्यात म. फुलेंच्या बरोबर अर्धे नाही तर सर्वांगीण, त्यांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने कार्य केलेले दिसते. एकोणिसाव्या शकताचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा या कालखंडात समाजात स्त्री शिक्षणाला कडाडून विरोध केला जात होता. अशा परिस्थितीत म. फुलेंनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले. नुसते शिक्षणच दिले नाही तर १ जानेवारी १८४८ मध्ये म. फुलेंनी जी शाळा स्थापन केली त्यात सावित्रीबाई अध्यापनाचे कार्य करू लागल्या. या संदर्भात पुढील विधान अत्यंत बोलके आहे. "सावित्रीबाईंच्या पहिल्या मुलीच्या शाळेची घंटा वाजली आणि अर्जुनाच्या पांचजन्य शंखाचा शत्रूंना गर्भगळित करून सोडणारा शंखनाद झाला, त्याप्रमाणेच सनातन्यांच्या बालेकिल्ल्यातील हा घंटानाद सावित्रीबाईंच्या स्त्री मुक्ती आंदोलनाची मुहूर्तमेढ ठरला"(१)

सावित्रीबाईंनी पेशवाईतील स्त्री जीवनाचा अभ्यास केला, स्त्रियांवर होणारे पाशवी अत्याचार त्यांना अंतर्मुख करून स्त्रियांच्या उद्धाराकरीता आपण काहीतरी करावे ही प्रेरणा देऊन गेले. म्हणूनच सावित्रीबाईंनी समाजाचा रोष पत्करून अंगावर चिखल व शेणाचा मारा सहन करून स्त्री-शुद्रातीशुद्रांना ज्ञानदानाचे कार्य केले. मुलींचे व त्यांच्या कुटूंबियांचे शिक्षणाकडे मन वळविण्यासाठी प्रयत्न केले. सावित्रीबाईंच्या स्त्रीमुक्तीच्या कार्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल. "त्या काळी सतीची चाल होती. सती जाणे ही भयानक प्रथा होती. इच्छा नसतांनाही पतीच्या प्रेताबरोबर जाळून घेऊन सती जावे लागे. सती जाणे हा भयानक अघोरी धार्मिक विधी पाहून सावित्रीबाईंना फार चीड आली. या विरोधी आवाज उठविला गेला. त्यावेळच्या सरकारवर सतीची चाल बंद करण्याविषयी कायदा करावा म्हणून सावित्रीबाई व ज्योतिराव यांनी दबाव आणला."(२) तसेच, म.फुले व सावित्रीबाई फुले या फुले दाम्पत्याने २८ जानेवारी १८५३ ला स्वत: बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना केली. हे बालहत्त्या प्रतिबंधक गृह यशस्वीपणे चालण्यास सिंहाचा वाटा सावित्रीबाईंचा होता. " महाराष्ट्रातील हे पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह असावे. सुरूवातीच्या चार वर्षात अंदाजे १०० विधवांचे बाळंतपण येथे झाले" त्यात सावित्रीबाईंनी स्वत: सुईणीचे कार्य केले.(३) सावित्रीबाईंना स्वत:ला मूल नव्हते. म्हणून याच गृहातील एका विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले. त्याला डॉक्टर केले. नंतर आपल्या मुलाचा विवाह ग्यानबा ससाणे यांच्या राधाबाई या मुलीशी केला. हा विवाह ४ फेब्रुवारी १८८९ मध्ये झाला हा मिश्रविवाह होता. तत्कालीन समाजात अनेक अमानुष प्रथा होत्या, त्यातीलच एक म्हणजे केशवपणाची प्रथा.

विधवा झालेल्या स्त्रियांच्या मर्जीविरूद्ध त्यांचा केशसंभार काढून घेतला जात असे कारण याला धर्माचा भक्कम आधार व सम्मती होती. "ब्राह्मण विधवांच्या केशवपनाविरूद्ध नाभिकांना संघटित करून त्यांचा संप घडवून आणण्याचा कल्पक उपक्रम 'दीनबंधू' चे संपाक, कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे व म.फुले यांनी घडवून आणला. त्यामागची प्रेरणा सावित्रीबाईच होत्या."[४] हा न्हाव्याचा संप १८६५ साली पुण्यात घडवून आणला. सावित्रीबाईंनी मोरो विठ्ठल वाळवेकर यांना 'गृहिणी' नावाचे मासिक सुरू करण्याचा आग्रह धरला. त्यात स्त्रीजीवनविषयक समस्यांची चर्चा असे. "सावित्रीबाई 'गृहिणी' या मासिकात टोपण नावाने लिखाण करीत असत. त्यांच्या लेखांचे विषय प्रामुख्याने सामाजिक व स्त्री समस्यांविषयक असत. त्यात जातीभेद निर्मूलन, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व, विधवा विवाह, बालविवाहाचे दुष्परिणाम, शुद्र-अतिशुद्रांकरीता शिक्षणाचे महत्त्व असे विषय असत. सावित्रीबाईंचे हे लेख स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या चळवळीचे सुरूवातीचे स्वरूप कसे होते हे समजून घेण्याकरीता अतिशय उपयुक्त म्हटले पाहिजेत."[५]

सावित्रीबाईंनी विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी स्त्री संघटनेची, सभेची स्थापना केली. दर १५ दिवसांनी संघटनेची बैठक होत असे. या संघटनेच्या मार्फत प्रौढ स्त्रियांचे शिक्षण, कुमारी माता, परित्यक्त्या, विधवा विवाह, बालहत्या, बाला-जरठ विवाह, अस्पृश्यता निवारण वगैरे अनेक विषयांवर चर्चा होत असे. स्त्रियांना आपल्या समस्या मांडण्यास व त्यांना बोलके करण्यास सावित्रीबाईंचा पुढाकारच कारणीभूत होता. त्यामुळे त्यांनाच स्त्री मुक्ती आंदोलनाची गंगोत्री असे संबोधणे इष्ट ठरेल.[६] स्त्री ही पारिवारीक बंधनात जखडलेली आहे. त्यामुळे तिला सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात विकास करण्याकरीता आवश्यक असलेले स्वातंत्र्य नाही, ही सावित्रीबाईंची व्यथा होती. म्हणूनच स्त्री अनावश्यक बंधनापासून मुक्त असावी असाच सावित्रीबाईंना स्त्री-मुक्तीचा अभिप्रेत अर्थ होता.[७] तत्कालीन प्रचलित विवाहपद्धती ही गरीबांच्या शोषणाचे एक साधन बनलेली होती. ती पद्धती बंद करून 'सत्यशोधक' पद्धतीने विवाह घडवून आणण्याकरीता त्यांनी स्वतंत्र चळवळ उभी केली व २५ डिसेंबर १८७३ पहिला सत्यशोधकी विवाह त्यांनी घडवून आणला. या विवाहामुळे संपूर्ण भारतात खळबळ उडाली, त्यांच्यावर टीका होऊ लागली. पण त्या थोड्याही डगमगल्या नाहीत.[८] १८७६ व १८९६ असा दोन्ही वर्षी महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडला. त्या दुष्काळाची माहिती सरकारकडे देण्याचे काम ज्योतिराव व सावित्रीबाईंनी पोटतिडकीने केले. सावित्रीबाईंनी दीन-दलितांना मदत केली. इंग्रज सरकारला दूष्काळ निवारण्यासाठी उपाय सुचविले. त्या पती-पत्नींनी ठिकठिकाणी अन्नछत्रे उभारली. ती चालविण्याची जबाबदारी सावित्रीबाईंच्या पुढाकाराने पार पडली. ठिकठिकाणी हे काम चालू होते. १८९० ला म.फुले वारले तेंव्हा सर्व भाऊबंद जमा झाले. आमचा मुलगा डॉ. यशवंत 'टिटवे' धरेल, असे त्यांनी ठणकावून सांगितले पण यशवंत हा दत्तक पुत्र असल्यामुळे त्याला टिटवे धरता येणार नाही असे ज्योतिबांच्या भावांनी सावित्रीबाईस सांगितले. तेंव्हा स्वतः सावित्रीबाईंनी टिटवे धरले व महात्मा फुलेंची प्रेतयात्रा काढाली. अंत्ययात्रेत टिटवे धरून त्या अग्रभागी चालल्या आणि त्यांनी स्वतःच्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नि दिला. भारताच्या हजारो वर्षाच्या इतिहासात एका स्त्रीने अग्नि देण्याचा हा पहिलाच प्रसंग असावा.[९] म.फुलेंच्या निधनानंतरही सावित्रीबाईंनी आपले सामाजिक कार्य सुरूच ठेवले. म.फुलेंच्या माघारी त्यांनी सत्यशोधक समाजाची धुरा यशस्वीपणे सांभाळली, योग्य पद्धतीने नेतृत्त्व केले. तसेच १८९६ साली महाराष्ट्रात प्लेगची भयानक साथ आली. सावित्रीबाईंनी यशवंतला ससाण्यांच्या माळरानावर दवाखाना घालायला लावला. त्या स्वतः आजारी माणसांना उचलून दवाखान्यात आणित, त्यांच्यावर उपचार करीत, त्यातच सावित्रीबाईंना प्लेगची बाधा झाली आणि १० मार्च १८९६ रोजी रात्री ९.०० वाजता त्यांचे प्लेगमुळे निधन झाले.

सारांश भारतातील स्त्रियांच्या स्त्री मुक्तीकरीता रणरागिणीचे रूप धारण करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे कार्य व कर्तृत्त्व अलौकिक आहे. त्या आयुष्यभर स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी कार्यरत राहिल्या, स्त्रियांच्या हक्कासाठी लढल्या. स्त्रियांमध्ये आपल्या हक्काची जाणिव निर्माण होण्यासाठी 'भगिनींनो, साक्षर व्हा आणि निर्भय व्हा' असा संदेश त्यांनी दिला. एंकदरीतच स्त्री शोषण, गुलामी, अन्याय, अत्याचार यांना सामाजिक, धार्मिक चौकट प्राप्त झाली होती. ती चौकटच आपल्या साहसी कार्याने उध्वस्त करण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्री मुक्ती व सावित्रीबाई यांचे अतुट नाते प्रत्ययास येते. त्यांच्या सर्व कार्यामुळेच त्या स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या ठरतात.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) सावित्रीबाई फुले : अष्टपैलु व्यक्तिमत्त्व, प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, पृ. १४६. २) सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्त्व, (संपा) डॉ.मा.गो.माळी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.क्रं. ७३ ३) सावित्रीबाई फुले : अष्टपैलु व्यक्तिमत्त्व, प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, पृ.क्रं. १४८ ४) महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, (संपा) हरी नरके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म.ज्योतिराव फुले आणि राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाश समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.क्रं. ३० ५) सावित्रीबाई फुले : अष्टपैलु व्यक्तिमत्त्व, प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, पृ.क्रं. १५० ६) सावित्रीबाई फुले : अष्टपैलु व्यक्तिमत्त्व, प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, पृ.क्रं. १४८ ७) सावित्रीबाई फुले : अष्टपैलु व्यक्तिमत्त्व, प्रा.ना.ग.पवार, पद्मगंधा प्रकाशन, पृ.क्रं. १४८ ८) सत्यप्रवर्तक, जयसिंग वाघ, कौशल्य प्रकाशन, पृ.क्रं.३६ ९) महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, (संपा) हरी नरके, पृ.क्रं. ३४